**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १५ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी शांततेत मतदान / उद्या सकाळी १० वाजेपासून मतमोजणी.**
2. **दुपारी साडे तीन वाजेपर्यंत विदर्भात अकोल्यात सर्वाधिक मतदान, तर नागपुरात ४१ पूर्णांक ९ दशांश टक्के मतदानाची नोंद.**
3. **विविध ठिकाणी शाई पुसली जात असल्याचा तसंच मतदान केंद्रांवर गोंधळ झाल्याचा विरोधकांचा आरोप.**
4. **समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.**
5. **राज्यात सिकलसेलचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये आजपासून विशेष तपासणी 'अरुणोदय' मोहीम सुरू.**

---

**मतदान टक्केवारी आणि सेलिब्रिटी/नेते मतदान**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी आज मतदान घेण्यात झाल. सर्व महापालिकांच्या ८९३ प्रभागांतल्या दोन हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी १५ हजार ९३१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. नागरिकांना मतदान करता यावं, यासाठी महापालिका क्षेत्रातल्या सर्व कार्यालयांना आज सुटी जाहीर करण्यात आली. विविध ठिकाणी मतदान करणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून अनेक आस्थापनांकडून सवलती जाहीर करण्यात आल्याचं दिसून आलं. दरम्यान दुपारी साडेतीन वाजेपर्यंत विदर्भात नागपूर इथं ४१.०९%; चंद्रपूर इथं ३८.१२%; अकोल्यात ४३.३५% आणि अमरावती इथं ४०.६२% मतदान झाल्याची नोंद आहे. नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी महाल मधल्या शाळेत मतदानाचा हक्क बजावला तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज सकाळी सहपरिवार, न्यू इंग्लिश शाळा, महाल इथं मतदानाचा हक्क बजावला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात कुटुंबियांसह आपला

मतदानाचा हक्क बजावला. याशिवाय आमदार प्रवीण दटके, भाजप नेते सुधाकर कोहळे, नागपूरचे जिल्हाधिकारी विपीन इटनकर, महानगरपालिका आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी मतदानाचा हक्क बजावला. तसंच नागपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे आणि माजीमंत्री आणि आमदार डॉ.नितीन राऊत यांनी, सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला. चंद्रपूरमध्ये आमदार किशोर जोरगेवार, काँग्रेस नेते विजय वड्डेटीवार यांनी सहपरिवार मतदान केलं, तर अकोल्यात वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी देखील सपत्नीक मतदान केलं. चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी देखील आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

------------------------------------------

**महाराष्ट्र मतदान**

दरम्यान, आज झालेल्या निवडणुकांमध्ये दुपारी साडेतीन वाजेपर्यंत महाराष्ट्रात अनेक ठिकाणी 40% किंवा त्यापेक्षा कमी मतदान नोंदवण्यात आलं. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत मुंबईत 41.08, कल्याण डोंबिवली इथं ४०.०७ तर पनवेल इथं 44% मतदान नोंदवण्यात आलं. पुणे इथं दुपारी साडेतीन वाजेपर्यंत 39% तर नाशिक इथं 37.01 टक्के मतदान नोंदवण्यात आलं.

------------------------------------------

**शाई पुसण्याचा प्रयत्न**

राज्यात महापालिका मतदानानंतर मतदारांच्या बोटाला लावलेली शाई पुसण्याचे प्रकार उघडकीला येत आहेत. याबद्दल विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी शाई ऐवजी मार्कर पेन वापरले जात आहे आणि त्यांचा ठसा पुसला जात आहे असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे -

***(होल्ड बाईट - उद्धव ठाकरे - १९ सेकंद)***

यासंदर्भात निवडणूक आयोगानं लक्ष द्यावं अशी मागणी मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेन्द्र फडणवीस यांनी केली -

***(होल्ड बाईट - फडणवीस - २४ सेकंद)***

काल पश्चिम नागपूरातील गोरेवाडा इथं भाजपचं उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. हा हल्ला म्हणजे लोकतंत्राला काळीमा फासणारा असून

यात लोकशाहीच जिंकेल असं फडणवीस यांनी स्पष्ट केलं. मतदानाच्या वेळी जर एखाद ईव्हीएम बंद पडलं तर त्याऐवजी माहिती संकलनाकरिता पॅड मशीन वापरल जात आहे असं देखील त्यांनी स्पष्ट केलं. मतदान हा आपला अधिकारच नव्हे तर आपलं कर्तव्य असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. दरम्यान, बोटावरील मतदानाची शाई पुसण्याचा प्रयत्न करून पुन्हा मतदान करण्याचा प्रयत्न करणे हे गंभीर गैरकृत्य असून अशा प्रकरणात संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अस स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगान दिल आहे. शाई पुसली तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही, कारण मतदानानंतर मतदाराची नोंद घेतली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 2011 पासून मार्कर पेनद्वारे शाई लावण्याची पद्धत लागू आहे. नखावर आणि नखाच्या वरच्या त्वचेवर ठळकपणे शाई लावण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शाई पुसून गैरकृत्य करू नये, असं आवाहन निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केलं आहे.

***(होल्ड बाईट - वाघमारे - ३३ सेकंद)***

---

**मतदान आरोप**

काही ठिकाणी सर्व मतांची नोंद झाल्यावर, 'बीप' आवाज येत नसल्याचा दावा, खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. अनेक मतदारांना मतदान केंद्रही सापडत नाही. काही ठिकाणी मतदान केंद्राबाहेर पैसे वाटप सुरू असल्याचा आरोप त्यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात केला आहे. यामुळं सर्व प्रक्रिया संशयात सापडली असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे. तर राज्यातल्या महापालिका निवडणुकांच्या दरम्यान सुरू असलेल्या गोंधळ प्रकरणी सर्व निवडणूक यंत्रणेवर कारवाई करण्याची मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

---

**तुरळक घटना/ पालिका निवडणूक**

**अकोला** शहरातील पोळा चौकाजवळ असलेल्या महापालिकेच्या उच्च प्राथमिक उर्दू कन्या शाळा क्रमांक ३ इथल्या मतदान केंद्रावर काही उमेदवारांमध्ये किरकोळ वाद निर्माण झाल्याची घटना घडली. मतदान केंद्राच्या परिसरात उमेदवार फिरत असल्याचा आरोप एकमेकांवर करण्यात आला. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप

करून मध्यस्थी केल्यानं हा वाद तात्काळ निवळला. **चंद्रपूर** शहरातील प्रभाग क्रमांक 12 इथं सन्मित्र नगर केंद्रावर ईव्हीएम मशीन बंद पडल्याची बातमी काही वृत्तवाहिन्यांवर आली होती, परंतु या ठिकाणी लागलीच ईव्हीएम सुरळीत झाल्याची माहिती आहे. **नागपूर**च्या प्रभाग 30 मधील संत कबीर अप्पर प्रायमरी मतदान केंद्रावर मतदाना दरम्यान निर्माण झालेल्या गोंधळाच्या परिस्थिती नंतर बॅलेट युनिट बदलण्यात आल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनं दिली आहे.

-------------------------------------------

**राष्ट्रकुल परिषद**

लोकशाही संस्था आणि लोकशाही प्रक्रियांमुळे लोकशाही राज्यपद्धतीला स्थैर्य आणि वेग मिळतो, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं राष्ट्रकुल संघटनेतल्या देशांचे पीठासीन अधिकारी आणि अध्यक्षांच्या परिषदेला ते संबोधित करत होते. या परिषदेचं महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले-

***(होल्ड बाईट- पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ सेकंद)***

***इस बार की कॉन्फ्रेंस का एक प्रमुख लक्ष्य ये भी है कि कैसे हम अलग अलग तरीकों से पार्लियामेंट्री डेमोक्रेसी की नॉलेज और अंडरस्टैंडिंग को प्रोमोट करें। इसमें स्पीकर्स और प्रिसाइडिंग ऑफिसर से दोनों की भूमिका बहुत महत्वपूर्ण है। ये काम लोगों को देश के डेमोक्रेटिक प्रोसेसेस में बड़ी भूमिका से जोड़ने का काम है। भारत की संसद पहले से ही ऐसे काम को कर रही है।***

भारतानं आपल्या विविधतेतून आपली लोकशाही बळकट केली, असं पंतप्रधान म्हणाले. समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ आहे आणि कोणताही भेदभाव न करता सामाजिक हित साधण्यासाठी सरकार काम करत आहे असं, त्यांनी सांगितलं. ग्लोबल साऊथचे मुद्दे प्रत्येक जागतिक मंचावर भारत जोरकसपणे मांडत आहे असंही, त्यांनी सांगितलं.

-------------------------------------------

**अरुणोदय मोहीम**

राज्यात सिकलसेलचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या, २१ जिल्ह्यांमध्ये आजपासून विशेष तपासणी, 'अरुणोदय' मोहीम सुरू होत आहे. २७ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या

या मोहिमेत, सिकलसेलचं लवकर निदान आणि उपचारांचं महत्त्व सांगितलं जाणार आहे. २०१९ ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत जवळपास, दीड कोटी लोकांची तपासणी करण्यात आली होती. त्यात बारा हजार ४२० सिकलसेल रुग्ण आणि एक लाख चोविस हजार २७५ सिकलसेल वाहक होते. त्यापैकी बहुतेक रुग्ण आदिवासी बहुल जिल्ह्यांतील असल्याचे आरोग्य विभागानं सांगितलं.

-------------------------------------------

**आयर्नमॅन-5150 ट्रायथलॉन**

चेन्नई इथं पार पडलेल्या भारतातील पहिल्या आयर्नमॅन-५१५० ट्रायथलॉन स्पर्धेत, नागपूरच्या कस्तुरी तामणकर आणि दक्ष खंते यांनी, उल्लेखनीय यश मिळवले. कस्तुरी तामणकरने २५-२९ वयोगटात, प्रथम क्रमांक तर दक्ष खंतेने १८-२४ वयोगटात तृतीय क्रमांक पटकावला.

-------------------------------------------

**हवामान**

विदर्भात आज गोंदिया जिल्ह्यात 11.6 अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली. गोंदिया नंतर नागपूर इथं 13 अंश सेल्सिअस तर गडचिरोली इथं 13.2 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आगामी 19 तारखेपर्यंत हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे.

-------------------------------------------